CHE/DP/55/Gen
2016-17

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**दीपेन्द्र सिंह कुशवाह** भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

अ.शा.पत्र क्र. कार्या-3क/बिशे/751/14
दिनांक : 26/09/2016
MC-910399

विषय:-विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) सन 2014 चा अध्यादेश क्र.17 नुसार कार्यवाही करणेबाबत.

आदरणीय सर,

शासन, महसूल व वन विभागाने दि.22/8/2014 रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) सन 2014 चा अध्यादेश क्र.17 बाबतची अधिसुचना निर्गमित केलेली असून सदर अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 42 नंतर खाली नमूद केलेप्रमाणे कलम 42(अ) व्दारे नवीन तरतुद समाविष्ट केली आहे ती पुढीलप्रमाणे.

"42अ.(1) कलम 42 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,-

(अ) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 च्या तरतूदीनुसार तयार केलेल्या व प्रसिध्द केलेल्या मंजूर विकास योजनेत किंवा प्रारुप विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरीता भोगवटादार वर्ग -1 म्हणून धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या वापराचे रुपांतरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे कोणत्याही पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही. तथापि, नियोजन प्राधिकरण, जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा आणि [illegible] कोणताही असल्यास, याची संबंधित महसुली प्राधिकाऱ्याकडून विनिश्चित करील आणि त्याबाबतची विनिश्चिती केल्यानंतर ते महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या तरतुदींनुसार विकासाची परवानगी देईल.

(ब) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 च्या तरतुदींनुसार तयार करण्यांत आलेल्या व प्रसिध्द करण्यांत आलेल्या मंजूर विकास योजनेत किंवा प्रारुप विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरीता, भोगवटदार-वर्ग-2 म्हणून धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या किंवा शासनाकडून पट्टयाने घेतलेल्या जमिनीच्या वापराचे रुपांतरण करण्यासाठी, भोगवटदार, जमिनीच्या वापरातील बदलाच्या परवानगीसाठी नियोजन प्राधिकरणाकडे अर्ज करील, आणि नियोजन प्राधिकरण, उक्त भोगवटदाराला अशा बदलासाठी जिल्हाधिकारी यांची ना हरकत मिळविण्याचे निदेश देईल, जिल्हाधिकारी ज्या दस्तऐवजांद्वारे जमीन दिली जाते त्या दस्तऐवजांची आणि ज्या संबध्द कायद्यांद्वारे संबंधित जमिनीचे नियमन केले जाते त्या संबध्द कायद्यांची तपासणी करील आणि जर अर्जदाराला ना हरकत प्रमाणपत्र देणे अनुज्ञेय असेल तर त्यास, त्या प्रयोजनासाठी देय नजराणा आणि शासकीय देणी प्रदान करण्यास फर्मावील आणि ती दिल्यानंतर, जिल्हाधिकारी अशा जमिनीच्या वापरातील बदलासाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, संबंधित नियोजन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 च्या तरतूदीनुसार विकासाची परवानगी देईल.

ICC/G/2480
04/10/16
18/10

महानगरपालिका आयुक्त
ChE(D.P)

तरी उपरोक्त अधिसुचनेच्या तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत आपले अधिपत्याखालील संबंधित विभागास आवश्यक सूचना दयाव्यात ही विनंती. सोबत उपरोक्त अधिसूचनेच्या प्रती अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

आदरपूर्वक

आपला विश्वासू

(दीपेन्द्र सिंह कुशवाह)

प्रति,
मा.श्री.अजय मेहता (आय.ए.एस)
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
१० वा मजला, प्रशासकीय इमारत, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
कार्यालय : ०२२-२६५१ ४७४२ फॅक्स : ०२२-२६५५ ६८०५
ई-मेल- collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in / collectormsd@gmail.com
Website : mumbaisuburban.gov.in

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
29 SEP 2016
समय ११, १२, १३, १४
१५, १६, १७, १८
क्रमांक

प्र.अ./वि.नि./21521/प्रथा/२०१
6/10/16

| बृहन्मुंबई महानगर पालिका प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांचे कार्यालय | | | |
|---|---|---|---|
| ११ / १२ / १ / २ | 1/552 04 OCT 2016 021521 | | ३ / ४ / ५ / ६ |
| प्र.प्र.अ./वि.नि./ | | | |
| साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप |
| प्र. अधि. | टिडीआर | लेखा | आस्था |

उप.प्र.अभि. (वि.नि.) - I & II
उप.प्र.अभि. (इ.प्र.) शहर/पूउप/वि नक्ष/प उप - I & II 'X'

Pl. go through the contents & act accordingly

04/10/16
प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)

AO(DP)II/H.C.(Gen)

Circulate to above as per 'X' and give new circular number & keep one copy in circular file

10/10/16
DyCE(DP)I

HC(G)
13/10/16
AO(DP)II
श्रीमसोनार
15-10-16